# तरुणांनी ओळख निर्माण करण्यासाठी नेहमी झटावे

## पुरुषोत्तम महाराज पाटील : 'यिन'चा वर्धापन दिन

**पिंपरी, ता. ९ : ''आयुष्यात यशस्वी होण्यासाठी तरुणांनी खडतर मेहनत घेतली पाहिजे. आपली ओळख निर्माण करण्यासाठी नेहमी झटून प्रयत्नशील राहावे,'' असे आग्रही प्रतिपादन सुप्रसिद्ध कीर्तनकार पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी केले. तरुणांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'यिन' नेहमीच अग्रेसर असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.**

निमित्त होते सकाळ माध्यम समुहाच्या 'यिन'च्या ११व्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे. यानिमित्त 'यूथ नेक्स्ट जेन' या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. एस. बी. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी पिंपरी-चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेतच्या प्राचार्य डॉ. स्मिता पाठक, एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, निगडी प्राधिकरणच्या प्राचार्य डॉ. स्मिता सूर्यवंशी, रावेतच्या पिंपरी-चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या इस्प्रित कौर, एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्रा. ऋतुराज कुलकर्णी, प्रा. प्रमोद संकपाळ, तळेगावच्या इंद्रायणी विद्यालय मंदिराचे प्रा. सत्यजित खांडगे, रसिकलाल माणिकचंद धारीवाल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, चिंचवडच्या प्रिश्मा पाटील, प्रा. रूपाली कुदरे, महाविद्यालयाच्या यिन प्रतिनिधी काजल माहेश्वरी आदी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, ''माणसाने मुक्तपणे व्यक्त झाले पाहिजे, म्हणजे कुठल्याही प्रकारे आजार जडत नाही. त्यामुळे मोकळेपणाने बोलायला शिका.''

समन्वय समितीमध्ये धारा राठौर,



'यूथ नेक्स्ट जेन' या विशेषांकाचे प्रकाशन करताना सुप्रसिद्ध कीर्तनकार पुरुषोत्तम महाराज पाटील.

अनुष्का मुकरे, प्रगती मसाळ, सारा शेख, प्रणव भोसले, दर्शन येडगे, साहिल टिंगरे, रुतिक कांबळे, सिद्धी ढमाले, निधी ठाकूर, भूमिका गडलिंग, संस्कृती पवार, हर्षदा बाबर, श्रावणी दहीहंडे, रोहन हुलावळे, दिग्विजय फाळके, सुनिधी कांबळे, सोहेल शेख, ऋषीकेश पवार यांनी संयोजन केले. सुहानी सोरटे हिने गणेश वंदना सादर केली. संयोजन अनिकेत मोरे यांनी केले.

कीर्ती धारवाडकर म्हणाल्या, ''यिन उपक्रम वाखाणण्याजोगा आहे. यिनमुळे उपक्रमात तरुणांची ऊर्जा रुपांतरीत होत आहे.''

इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन रिसर्च अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ. संतोष खलाटे, ओतुरच्या अण्णासाहेब वाघिरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी मनोगत व्यक्त केले.

'पीसीईटी'चे डिजिटल मार्केटिंग हेड केतन देसले म्हणाले, ''यिनमधून विद्यार्थी घडले आहेत. यिन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. अनेक विद्यार्थ्यांची यशोगाथा यिनच्या पुस्तकात मांडली आहे.'' प्रास्ताविक श्यामसुंदर माडेवार यांनी केले. प्रभ नलावडे यांनी सूत्रसंचालन केले.



**एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनमेंट, निगडी प्राधिकरण :** सकाळ 'यिन'च्या ११व्या वर्धापन दिनानिमित्त 'यूथ नेक्स्ट जेन' या विशेषांकाचे प्रकाश करताना (डावीकडून) तेजोनिधी भंडारे, केतन देसले, पवन नव्हाडे, कीर्ती धारवाडकर आणि प्रा. रूपाली कुदरे.

> आजच्याघडीला विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहे. सकाळ यिनच्या माध्यमातून युवापिढी घडत आहे. रस्ता सुरक्षा या उपक्रमात युवकांनी मुख्य भूमिका बजावली पाहिजे. कारण रस्ता सध्या सर्वाधि मृत्यू हे रस्ता अपघातात घडत आहेत. तरुणांनी जबाबदारीने वागले पाहिजे.
> **- पवन नव्हाडे,** सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी

> भारत हा तरुणांचा देश आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतात युवकांच संख्या सर्वाधिक आहे. युवकांनी ऊर्जेचा वापर केला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय ही संकल्पना शिक्षणात मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहे. 'एआय'ची भीती बाळगू नका. 'एआय'मध्ये अनेक संधी आहेत.
> **- तेजोनिधी भंडारे,** मुख्य व्यवस्थापक, रिलायन्स ॲनिमेशन